# प्रकरण ४ थे : महाराष्ट्रातील पर्यटन केंद्रे / स्थळे

**४.१महाराष्ट्रातील नैसर्गिक पर्यटन केंद्रे**
**४.२ महाराष्ट्रातील धार्मिक पर्यटन केंद्रे**
**४.3 महाराष्ट्रातील सांस्कृतिक पर्यटन केंद्रे**
**४.४महाराष्ट्रातील ऐतिहासिक पर्यटन केंद्रे**

## ४.१ महाराष्ट्रातील नैसर्गिक पर्यटन स्थळे/केंद्रे (Natural tourism centres in Maharashtra)

महाराष्ट्राला निसर्गाचे फार वरदान आहे. महाराष्ट्रामध्ये नैसर्गिक पर्यटन स्थळांमध्ये थंड हवेची ठिकाणे, समुद्रकिनाऱ्यावरील बीचेस, अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, सरोवरे, धबधबे इत्यादी पर्यटन स्थळाचा समावेश होतो . या पर्यटन स्थळाकडे पर्यटक नेहमीच आकर्षित होतात. महाराष्ट्रातील महत्त्वाची नैसर्गिक पर्यटन स्थळे पुढीलप्रमाणे

१.महाबळेश्वर

२. माथेरान

३. पाचगणी

४. आंबोली

५.लोणावळा

६.खंडाळा

७.चिखलदरा

८.लोणार सरोवर

९. ताडोबा अभयारण्य

१०. दाजीपूर अभयारण्य

११. माळढोक पक्षी अभयारण्य

१२. मेळघाट अभयारण्य

१३. कोयना अभयारण्य


प्रा.डॉ. एन.के.बनसोडे, भूगोल विभाग, भोगावती महाविद्यालय,कुरुकली

१४. तारकर्ली बीच

१५. ठोसेघर धबधबा

१६. मार्लेश्वर धबधबा

**१.महाबळेश्वर**

महाबळेश्वर हे ठिकाण महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्यातील एक थंड हवेचे ठिकाण व प्रेक्षणीय स्थळ असून, येथे पर्यटक वर्षभर भेट देतात. ब्रिटिश काळापासून महाबळेश्वराला लाभलेला उत्कृष्ट गिरीस्थान हा लौकिक आजही कायम आहे. समुद्रसपाटीपासून १,३७२ मीटर उंचीवर पश्चिम घाटांच्या रांगेत वसलेले महाबळेश्वर हे थंड हवेचे व सहलीचे निसर्गरम्य ठिकाण आहे. महाराष्ट्राचे नंदनवन म्हणून ओळखले जाणारे ठिकाण आहे. ब्रिटीशांनी या ठिकाणाला मुंबई प्रांताची उन्हाळयातील राजधानी म्हणून विकसीत केले होते. चेरापुंजी नंतर भारतात सर्वाधिक पाऊस पडणारे हे दुस-या क्रमांकाचे ठिकाण आहे. येथील सर्वात जुने ठिकाण म्हणजे क्षेत्र महाबळेश्वर. या मंदिरात कृष्णा, कोयना, सावित्री, गायत्री आणि वेण्णा या पाच नद्यांचा उगम होतो. स्ट्रॉबेरी, रासबेरी, मलबेरी ही महाराष्ट्रात इतर कुठेही न आढळणारी फळे आपल्याला महाबळेश्वरला मिळतात.

महाबळेश्वर पाहताना बॉम्बे पॉइंट, ऑर्थर सीट, केटस् पॉईंट, लॉडविक - विल्सन, एलफिस्टन पॉईंट्स, वेण्णा लेक, लिंगमळा धबधबा, तापोळा, जवळचे श्रीक्षेत्र महाबळेश्वर, येथील महादेवाचे मंदिर ही ठिकाणे महत्त्वाची आहेत

**२.माथेरान (महाराष्ट्र)**

महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्याच्या कर्जत तालुक्यातील प्रसिद्ध एक थंड हवेचे ठिकाण व प्रेक्षणीय स्थळ असून, येथे पर्यटक वर्षभर भेट देतात. या प्रदेशाच्या माथ्यावरील दाट वनश्रीमुळे याला ‘माथेरान’ हे नाव पडले असे म्हणतात. माथेरान वेगवेगळ्या टोकांवरून हिरवीगार वनश्री व परिसर यांचे विहंगम दृश्य दिसते. आरोग्यदायक व उत्साहवर्धक हवामान, मोहक सृष्टिसौंदर्य व मुंबईचे सान्निध्य यांमुळे या थंड हवेच्या ठिकाणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पर्यटकांसाठी हॉटेले, निवासगृहे, उपहारगृहे व भोजनालये, बाजार, उद्याने इ. सोयी उपलब्ध आहेत. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे येथे एक विश्रामगृह आहे. गावात रुग्णालय, दवाखाने, शाळा यांसारख्या नागरी सुविधाही आहेत. पर्यटकांचा हंगाम जवळजवळ वर्षभर, विशेषतः ऑक्टोबर-नोव्हेंबर आणि एप्रिल ते जून, असतो. येथे प्रवासाकरीता एक टॉय ट्रेन सुद्धा उपलब्ध आहे.

**३. पाचगणी**

पाचगणी महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील थंड हवेचे ठिकाण आहे.जवळपास महाबळेश्वर इतकेच उंच असलेले आणखी एक थंड हवेचे ठिकाण म्हणजे पाचगणी. महाबळेश्वरपासून हे ठिकाण अवघ्या १८-२० कि. मी. अंतरावर आहे. महाबळेश्वर इतकेच निसर्गसुंदर असलेले हे ठिकाण येथील पब्लिक स्कूल्ससाठी खूप प्रसिद्ध आहे. जुन्या काळात येथे पारशी लोकांनी बांधलेले बंगले आजही लक्ष वेधून घेतात. येथे राहण्याजेवणाच्या चांगल्या सोयी आहेत. पाच डोंगराच्या समूहावर हे ठिकाण विकसित झालेलं असल्याने त्यास पाचगणी नाव पडले असावे.

लोणावळा-खंडाळा ही ठिकाणं जशी एकमेकांपासून जवळ आहेत तसाच प्रकार महाबळेश्वर-पाचगणी यांच्या बाबतीत आहे. उत्कृष्ट हवामान आणि संपन्न निसर्ग हे पाचगणीचं स्वतःचं असं वैशिष्ट्य आहे. खोल दऱ्या, धबधबे, कमलगड, टेबल लँड, किडीज पार्क, पाचगणीच्या गुंफा ही काही प्रसिद्ध व पाहण्यासारखी प्रेक्षणीय स्थळं आहेत.येथील टेबल लँड वर अनेक चित्रपटांचं चित्रीकरण झालेलं आहे.

**४. आंबोली**

महाराष्ट्रातील थंड हवेच्या ठिकाणची राणी असं आंबोलीला म्हटलं तर ते वावगं ठरणार नाही. जगप्रसिद्ध जैववैविध्य असलेले निसर्गरम्य ठिकाण अशी आंबोलीची आता ख्याती झालेली आहे. शांत आणि निसर्गरम्य अशा आंबोलीच्या परिसरात नैसर्गिक साधनसंपत्तीची भरभराट पाहायला मिळते. सह्याद्रीच्या ऐन कण्यावर वसलेले आंबोली पूर्वीपासूनच सावंतवाडी संस्थानचे थंड हवेचे ठिकाण होते. पर्यटकांनी आवर्जुन वर्षातल्या कोणत्याही ऋतूमध्ये भेट द्यावे असे हे ठिकाण आहे. उंचावरून पडणारे धबधबे आंबोलीच्या सौंदर्यात अजूनच भर घालत असतात.

समुद्रसपाटीपासून 690 मीटर उंचावर असलेले सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली हे सुंदर आणि रमणीय ठिकाण आहे. सगळा परिसर हा अगदी घनदाट अरण्याचा आहे आणि तिथे आपल्याला बरेच धबधबे पाहायला मिळतात. वर्षाऋतू मध्ये होणारा प्रचंड पाऊस इथल्या सगळ्या डोंगरांना हिरवागर्द शालू नेसवतो. साहजिकच इंग्रज राज्यकर्ते या ठिकाणाच्या प्रेमात पडले आणि कर्नल वेस्ट्रॉप यांनी आंबोलीला गिरिस्थानाचा दर्जा मिळण्यासाठी खूपच मेहनत घेतली. हिवाळ्यात सगळा परिसर हा धुक्याची दुलई पांघरून बसलेला असतो आणि उंचावरून कोसळणारे धबधबे आपल्या डोळ्याचे पारणे फेडतात.

नागरतास धबधबा, हिरण्यकेशी, सी व्ह्यू पॉईंट, महादेवगड ही ठिकाणे पर्यटकांनी कायमच गजबजलेली असतात. कावळेसाद पॉईंट वरून तर सह्याद्रीच्या अजस्त्र रंगांचे भेदक दर्शन होते. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या विश्रामगृहासह इतरही अनेक हॉटेल्स इथे उपलब्ध असून राहण्याबरोबरच खाण्याची सोय सुद्धा फार छान केलेली आहे.

ऐन पावसाळ्यामध्ये आंबोलीला भेट देण्यासारखी दुसरी मजा नाही. संपूर्ण परिसर अगदी दिवसभर धुक्यात लपेटलेला असतो. निसर्गाचा स्पर्श आपल्या मनाला अगदी मोहवून टाकतो आणि एक प्रकारची मनःशांती सहजच लाभते. हिरण्यकेशी नदीचा उगम हा खूप निसर्गसंपन्न आहे. तिथपर्यंत जाण्याचा रस्ता काहीसा कच्चा आहे पण तिथे गेल्यावर दिसणारे निसर्गाचे रूप केवळ अवर्णनीय. तिथे पार्वतीचे एक छोटेसे देऊळ असून हिरण्यकेशी नदी इथल्याच डोंगरातून उगम पावते. तासनतास इथे बसून रहावेसे वाटते. हिरण्यकेशी नदी इथून पुढे कर्नाटकातून वाहत जाते आणि तिथे तिला घटप्रभा हे नाव मिळाले आहे.

**५.लोणावळा**

लोणावळा हे, महाराष्ट्रातील, पुणे जिल्ह्यामध्ये असलेले एक पर्यटनस्थळ आहे. लोणावळा पुण्यापासून ६४ किमी तसेच मुंबई पासून ९६ किमी अंतरावर आहे. मुंबई-पुणे महामार्गावर ६२५ मीटर उंचीवर सह्याद्रीच्या ऐन घाटमाथ्यावरील हे ठिकाण थंड हवेसाठी प्रसिद्ध आहे. विपुल वनराई, हिरवीगार निसर्गशोभा, वनश्रींने भरगच्च असलेले डोंगरमाथे व दऱ्या, पावसाळयात कडेलोट होऊन कोसळणारे धबधबे हे सारं काही मनाला खूपखूप सुखद वाटते. म्हणूनच या ठिकाणी पर्यटकांची नेहमी गर्दी असते.पावसाळयाच्या दिवसात पावसाच्या सरी अंगावर झेलत व ढगांच्या ओलसर धुकट वातावरणात हरवून जाण्यात खूप मजा वाटते. हिवाळयात तर धुके लपेटूनच फिरावे लागते. उन्हाळयात जांभळे आणि करवंदांची लयलूट असते.

**६.खंडाळा**

महाराष्ट्र राज्यातल्या सह्याद्री पर्वत रांगेतील पश्चिम घाटात खंडाळा हे हिल स्टेशन आहे. पुणे जिल्यातील लोणावळा या थंड हवेच्या ठिकाणापासून साधारण ३ कि.मी. आणि कर्जतपासून साधारण ७ कि.मी. अंतरावर आहे.

**७.चिखलदरा**

महाराट्रातील अमरावती जिल्ह्यात सातपुडा पर्वतरांगेत 'चिखलदरा' हे थंड हवेचे ठिकाण असून पर्यटकांना नेहमी खुणावत असते. चिखलदरा या ठिकाणाला मनोरंजक इतिहास आहे. इतिहास जाणून घेण्यासाठी

आपल्याला पार महाभारतात जावे लागते. पाच पांडव वनवासात असताना त्यांनी काही काळ चिखलदऱ्यात घालवला होता, असे म्हणतात. भीमाने येथील राजा कीचकचा वध करून एका दरीत फेकून दिला होता. ती दरी म्हणजेच कीचकदरी होय. परंतु, कालांतराने कीचकनरीचे रूपांतर चिखलदरीत झाले व चिखलदरीचे चिखलदऱ्यात. चिखलदरा हे विदर्भातील एकमेव थंड हवेचे ठिकाण आहे. विदर्भात सर्वाधिक ऊन असते. निसर्गाची शितलता अनुभवण्यासाठी पर्यटक येथे येत असतात.

**८.लोणार सरोवर**

लोणारचे सरोवर महाराष्ट्र राज्यामधील बुलढाणा जिल्ह्यातले खाऱ्या पाण्याचे सरोवर आहे. याची निर्मिती एका उल्कापातामुळे झाली.हे सरोवर औरंगाबाद शहरापासून १५० कि.मी. अंतरावर आहे. लोणार हे बेसॉल्ट खडकातील एकमेव मोठे आघाती विवर आहे. याचे पाणी अल्कधर्मी आहे. लोणार सरोवराच्या जतनासाठी व संवर्धनासाठी लोणार विवर हे वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित केले आहे.

**९. ताडोबा अभयारण्य**

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प महाराष्ट्रातील व्याघ्र प्रकल्प आहे. येथे वाघांची वस्ती आहे. हा प्रकल्प हा ताडोबा अभयारण्याचे ११६.५५ कि.मी. क्षेत्र व अंधारी अभयारण्याचे ५०८.८५ चौ.कि.मी.क्षेत्र मिळून संयुक्तपणे बनलेला आहे. याचे एकूण क्षेत्र सुमारे ६२५ चौ कि.मी. आहे.महाराष्ट्र शासनाने एका अधिसुचनेद्वारे या प्रकल्पाच्या सभोवताली संरक्षित क्षेत्र (बफर झोन) निर्माण केले आहे.येथे एकूण चार बफर झोन आहेत. या प्रकल्पालगतचे सुमारे ११०१.७७ चौ.कि.मी. क्षेत्र त्यात येते. त्यामध्ये ७९ गावांचा अंतर्भाव आहे. मानव व वन्यप्राण्यांचा संघर्ष टळावा असा त्यामागील हेतू आहे. सुमारे एक लाख पर्यटक ताडोबा अभयारण्यात वाघ बघण्यासाठी दरवर्षी येतात. ताडोबा - अंधारी व्याघ्र प्रकल्पात येणाऱ्या पर्यटकांची सोय व्हावी म्हणून 'एमटीडीसी'ने उत्तम व्यवस्था राहण्याची केली आहे. 'वाघ वाचला तर जंगल वाचेल' या धर्तीवर तेथे वाघाची सुरक्षितता लक्षात घेता पंचावन्न प्रोटेक्शन कॅम्प, विशेष टायगर फोर्स आणि हत्तीद्वारे गस्त केली जाते

**१०. दाजीपूर अभयारण्य**

राधानगरी अभयारण्य हे महाराष्ट्रातील कोल्हापुर जिल्ह्यातल्या राधानगरी तालुक्यातील अभयारण्य आहे. हे अभयारण्य पश्चिम घाटामध्ये सह्याद्री पर्वतरांगांच्या दक्षिण टोकाला आहे. राधानगरी अभयारण्य **रानगव्यांसाठी प्रसिद्ध** आहे. हे महाराष्ट्रातील सर्वात पहिले अभयारण्य आहे. याची स्थापना १९५८

साली करण्यात आली आणि त्यावेळी याला दाजीपूर अभयारण्य असे नाव देण्यात आले होते. या अभयारण्यात एकूण ३५ प्रकारच्या वन्यप्राण्यांची व २३५ प्रकारच्या पक्षी प्रजातींची नोंद झालेली आहे. या जंगलात १८०० प्रकारच्या वनस्पतीही आढळतात. त्यापैकी १५०० पेक्षा जास्त फुलझाडांच्या प्रजाती आहेत तर ३०० औषधी वनस्पती आहेत. युनेस्कोने २०१२मध्ये राधानगरी अभयारण्याचा जागतिक वारसा यादीत समावेश केला आहे. या जंगलात दुर्मीळ होत चाललेले पट्टेरी वाघ, पश्चिम घाटात दुर्मीळ झालेले लहान हरीण, गेळा (पिसोरी) आढळतात. तसेच बिबळया, गवा, सांबर, भेकर, डुक्कर, रानकुत्रा, अस्वल, शेकरु, रानमांजर, उदमांजर, ससा, लंगूर, याचबरोबर वटवाघळाच्या तीन जाती आढळतात.

कोल्हापूरपासून ८० कि.मी.वर असणाऱ्या दाजीपूर अभयारण्यात आढळणारे पक्षीविश्व, प्राणीसंपदा, औषधी वनस्पती, तसेच फुलपाखरे इथल्या संपन्न जैवविविधतेचे दर्शन घडवते. पर्यटकांना दाजीपूर अभयारण्याबरोबरच आवर्जून पाहण्यासारखे ठिकाण म्हणजे अभयारण्याची ओळख करून देणारे माहिति केंद्र, टेहाळणी मनोरे त्याच बरोबर शिवगड, हत्तीमहाल येथील साठमारी, राधानगरी धरणाच्या जडणघडणीचा साक्षीदार असलेला बेंझील व्हिला, उगवाई देवराई, हसणे देवराई आणि राधानगरी येथे नव्याने सुरू केलेले फुलपाखरू उद्यान हे पर्यटकांचे खास आकर्षण आहे.

**११. माळढोक पक्षी अभयारण्य**

माळढोक पक्षी अभयारण्याची स्थापना सन १९७९ ला झाली. माळढोक अभयारण्य हे "जवाहरलाल नेहरु माळढोक अभयारण्य, महाराष्ट्र" या नावाने देखील ओळखले जाते. अभयारण्य असलेल्या भागाची जमिन कोरड्या तसेच नापीक दर्जाची आहे. अजूनही माळढोक पक्षी आढळणाऱ्या भारतातील सहा राज्यांपैकी महाराष्ट्र हे एक राज्य आहे.

सन १९७२ ला प्रथम श्री. बी. एस. कुलकर्णी यांनी नान्नज आणि करमाळा येथे माळढोक पक्ष्याच्या अस्तित्वाचा शोध लावला होता. आणि त्यांच्या पक्षी संवर्धनाच्या अथक प्रयत्नांमुळेच डॉ. सलीम अली यांनी पक्ष्यांवरील संशोधनपर अहवाल तयार करण्यास नान्नजला भेट दिली. श्री. कुलकर्णी यांनी स्थानिक वृत्तपत्रांद्वारे लोकांना माळढोक पक्षाच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली. ते अजूनही सोलापूर जवळील नान्नज येथे पक्षी व त्यांचे निवासाच्या संवर्धनासाठी प्रयत्नशील आहेत. सुरुवातीच्या काळात माळढोक हा महाराष्ट्रातील अन्य साधारण पक्ष्यांमध्ये गणला जात असे.

**१२. मेळघाट अभयारण्य**

अमरावती जिल्ह्याच्या उत्तरेकडे सातपुडा पर्वतरांगा असून या रांगांच्या उत्तरेकडे मध्य प्रदेश राज्य आहे. चिखलदरा व धारणी या तालुक्यांतील हा डोंगराळ भाग मेळघाट नावाने ओळखला जात असून याच ठिकाणी हे अभयारण्य आणि व्याघ्रप्रकल्प आहे. या परिसरात कोरकू आदिवासी जमात राहत असून इतरही समाजांचे लोक राहतात. मेळघाटमध्ये 'सिपना' (अर्थ सागवान) नदी महत्त्वाची आहे. मेळघाट हा महाराष्ट्रातील एकमेव व्याघ्रप्रकल्प आहे. ह प्रकल्प अमरावती जिल्ह्यात आहे. इथे पट्टेवाले वाघ, बिबळे , रानगवे, सांबरे, भेकरे, रानडुकरे, वानरे, चितळ, नीलगायी, चौशिंगे, अस्वले, भुईअस्वले, रानमांजरे, कृष्णमृग, उडत्या खारी, तरस, कोल्हे, लांडगे, ससे असे पुष्कळ प्राणी आहेत. तसेच इथे मोर, रानकोंबड्या, राखी बगळा, भुरा बगळा, करकोचे, बलाक, बदके इत्यादी पक्षी आहेत. तसेच सर्पगरुड, ससाणे, घार, पोपट, सुगरण, पारवे, बुलबुल, सुतार, मैना असे रानपक्षीही आहेत. या अभयारण्यामध्ये वन्य प्राणी, रानपक्षी, सरपटणारे प्राणी यांचे व जलपक्षी यांचे संरक्षण केले जाते. सरपटणा-या प्राण्यामधे घोणस, मण्यार, फुरसे, फड्या नाग, अजगर, धामन, हरणटोळ, वृक्षसर्प या सापांचा सामवेश आहे. रंग बदलणा-या शॅमेलिऑन सरड्यांसह पाच् प्रकारचे सरडे मेळघाट अभयारण्यात आढळतात. अभयारण्यातून वाहणा-या नद्यांमध्ये २० प्रकारचे मासे आहेत. डोहामध्ये मगरी व घोरपडी असतात.

**१३. कोयना अभयारण्य**

कोयना अभयारण्य हे महाराष्ट्रातील अभयारण्य असून सातारा जिल्ह्यात आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सर्वाधिक घनदाट जंगलांमध्ये कोयना अभयारण्याचा समावेश होतो. हे अभयारण्य कोयना धरणाच्या भिंतीमागील शिवसागर जलाशयाच्या कडेकडेने पसरलेले आहे. इतिहासात हे जंगल जावळीचे खोरे म्हणून प्रसिद्ध आहे. अभयारण्याचे याचे एकूण क्षेत्रफळ ४२६ चौ.किमी असून याला १९८५ मध्ये अभयारण्याचा दर्जा मिळाला.या अभयारण्याला व्याघ्रप्रकल्पाचा दर्जाही मिळावा म्हणून राज्य सरकार प्रयत्नशील आहे

**१४. तारकर्ली बीच**

मालवणपासून अवघ्या ७ कि.मी. अंतरावर अतिशय स्वच्छ व सुंदर असा समुद्रकिनारा आणि खाडी ह्यांच्या अनोख्या संगमातून तयार झालेले अद्भूत सौंदर्य तारकर्ली येथे पाहण्यास मिळते. विस्तीर्ण पसरलेला समुद्रकिनारा, पायांना कोमल स्पर्श करणारी मऊ वाळू, कोवळे उन. स्वर्ग यापेक्षा काही वेगळा असतो काय? तारकर्ली किनाऱ्यावर गेल्यानंतर या स्वर्गाचा अनुभव येतो. अतिशय सुंदर असा समुद्रकिनारा, बांबूची, सुपारीची झाडे पाहून मन प्रसन्न होते. तीरावरील नारळी पोफळीची हीरवीगार नयनरम्या दौलत , सुर्यास्त् आणि सूर्योदय या

दोन्हींचे अनोखे दिव्य सौंदर्य न्या◌ीहाळण्यारसाठी अप्रतिम स्थळ म्हरणजेच तारकर्ली . येथे थांबून निसर्गाचा आनंद घेण्यासाठी रिसॉर्ट आपल्या सेवेत हजर आहेत. येथील समुद्र किनारे एवढे नितळ, स्वच्छ आहेत की पाण्यातील सौदर्य अगदी साध्या डोळयांनी न्याहाळता येते. निळेशार पाणी आणि क्षितिजापर्यंत पसरलेला किनारा रोजच्या ताणतणावापासून दूर ठेवतो. मनाला शांतावतो. गर्दीपासून दूर शांत, निवांत क्षण घालवण्यासाठी हे ठिकाण नक्की भेट देण्यासारखे आहे. तंबूत निवास, नावेतून सफर व स्कूबा डायव्हिंगचा अनुभवदेखील येथे घेता येतो. एमआयडीसीने तारकर्लीला प्रसिद्धी मिळवून देण्यात विशेष हातभार लावलाय. समुद्रसफारीमध्ये डॉल्फीन पॉईंट, गोल्डन रॉक, संगम आणि सुनामी आयलंड हे चार पॉईंट दाखवल्या जातात.

**१५. ठोसेघर धबधबा**

साता-यातील प्रसिद्ध ठोसेघर धबधबा अनुभवण्यासाठी राज्यभरातुन पर्यटक गर्दी करु लागले आहेत. हिरवाईचा शालू अन् धुक्याची दुलई पांघरलेला रम्य परिसर, ऊन-पावसाचा खेळ, फेसाळलेले धबधबे, असा हा सृष्टिसौंदर्याचा रम्य सोहळा याची देही याची डोळा अनुभवण्यासाठी पर्यटकांची पावलं ठोसेघरकडे वळतायेत.

**१६. मार्लेश्वर धबधबा**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या संगमेश्वर तालुक्यातील देवरुख शहरापासून १८ किमी अंतरावरील मारळ या गावाजवळ हा मार्लेश्वरचा धबधबा आहे. पश्चिम घाटातील एक अत्यंत प्रेक्षणीय असे हे स्थळ आहे.

मार्लेश्वरला जाण्यासाठी एस.टी.ची सुविधा उपलब्ध आहे. कोल्हापूरहून येताना आंबा घाटामध्ये कळकदरा येथून खडीकोळवण मार्गे मार्लेश्वर सुमारे २० किमी आहे, तर रत्नागिरीहून वा मुंबईहून येताना देवरुखहून हातीव मार्गे सुमारे १८ किमी अंतरावर आहे. या मार्गावर पावसाळयात अनेक लहान मोठे धबधबे कोसळत असतात.

## ४.२ महाराष्ट्रातील धार्मिक पर्यटन केंद्रे (Religious tourism centers in Maharashtra)

महाराष्ट्र राज्यात धार्मिक पर्यटन स्थळे अनेक आहेत त्यातील काही महत्त्वाची धार्मिक पर्यटन स्थळे पुढीलप्रमाणे

**१.साईबाबा मंदिर (शिर्डी)**

**२. भीमा शंकर मंदिर (भीमाशंकर)**

**३. महालक्ष्मी मंदिर (कोल्हापूर)**

**४. गणेश मंदिर (गणपतीपुळे)**

**५ शनि शिंगणापूर, अहमदनगर**

**६.ज्योतिबा मंदिर, वाडी रत्नागिरी (कोल्हापूर)**

**७. विठ्ठल मंदिर,पंढरपुर (सोलापूर)**

**८. श्रीक्षेत्र नृसिंहवाडी (कोल्हापूर)**

**९. तुळजाभवानी मंदिर, तुळजापूर (उस्मानाबाद)**

**१०. श्री स्वामी समर्थ मंदिर ,अक्कलकोट (सोलापूर)**

**११. श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर ,मुंबई**

**१२. संत ज्ञानेश्वर समाधी, आळंदी**

**13. संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज जन्मस्थान, पुणे**

**१४. खंडोबा जेजुरी**

**१५. श्री क्षेत्र शेगाव**

**१६. सचखंड साहिब गुरुव्दारा, नांदेड**

**१७. हाजी अली दर्गा (मशीद ),मुंबई**

**१८.दीक्षाभूमी (नागपूर)**

**१.साईबाबा मंदिर (शिर्डी)**

महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील शिर्डी हे एक धार्मिक पर्यटन स्थळ आहे. या ठिकाणी श्री साईबाबा मंदिर भारतातील दुसरे श्रीमंत धार्मिक पर्यटन स्थळ आहे. इ.स.च्या १९च्या शतकाच्या उत्तरार्धात संत साईबाबांच्या वास्तव्यामुळे शिर्डी नावारूपास येऊ लागले. साईबाबांच्या पश्चात तेथे

भक्तांनी उभारलेल्या साईबाबा मंदिरामुळे धार्मिक क्षेत्र म्हणून हे प्रसिद्धी पावले आहे.शिर्डीला साईनगर देखील म्हणतात.

**२. भीमा शंकर मंदिर (भीमाशंकर)**

भीमाशंकर हे पुणे जिल्ह्यात असून पुणे जिल्ह्याच्या खेड तालुक्यात आहे.भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. या ज्योतिर्लिंगामधून पश्चिमी महाराष्ट्रातील प्रमुख नद्यांपैकी एक अशी भीमा नदी उगम पावते. अतिशय घनदाट जंगल व तीर्थक्षेत्रामुळे हे ठिकाण पुणे जिल्ह्यातील एक प्रमुख पर्यटन स्थळ बनले आहे भगवान शंकराचे हे धार्मिक स्थळ प्रसिद्ध आहे. भिमाशंकर हे खुप सुंदर ठिकाण आहे.भीमाशंकर येथील भीमा नदीचा उगम पाहणे खरोखरच एक अविस्मरणीय आनंद आहे. सह्याद्रीच्या पश्चिकडील पसरलेल्या एका रांगेवरील उंच डोंगरावर भीमाशंकर आहे. प्रचंड गर्द झाडी, जंगल व उंच डोंगराच्या कुशीत भीमाशंकराचे मंदिर वसलेले आहे.

**३. महालक्ष्मी मंदिर (कोल्हापूर)**

कोल्हापूर नगरातील श्री महालक्ष्मी मंदिर हे ५२ शक्तिपीठांपैकी एक आणि महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक आहे. या पीठाचा उल्लेख पुराणांमध्ये आढळून येतो. हे महालक्ष्मीचे मंदिर चालुक्य राजांनी इ.स.सातव्या शतकात बांधले गेले.हे तीर्थस्थान मातृक क्षेत्र म्हणजे करवीर मातृपूजेचे आद्य क्षेत्र व शक्ती उपासक म्हणून तसेच दक्षिण काशी म्हणून ओळखले जाणारे तीर्थक्षेत्र मानले जाते. कोल्हापूरनिवासिनी म्हणजेच करवीर निवासिनी महालक्ष्मी जगदंबा हिच्या देवळामुळे कोल्हापूरला महत्त्व प्राप्त झाले आहे. कोल्हापूर देवी महालक्ष्मी व अंबाबाई म्हणून ओळखले जाते

**४. गणेश मंदिर (गणपतीपुळे)**

गणपतीपुळे हे रत्नागिरी जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे. येथील गणपतीची मूर्ती स्वयंभू आहे अशी मान्यता आहे. सह्याद्री पर्वतातील डोंगराळ भागात विराजलेली नैसर्गिक मूर्ती आणि जवळच पश्चिमेला अरबी समुद्र ह्यामुळे हे देऊळ आगळेवेगळे आहे. गणपतीची मूर्ती डोंगराच्या बाजूला असल्याने तिला प्रदक्षिणा घालण्यासाठी संपूर्ण डोंगराला प्रदक्षिणा घालणे क्रमप्राप्त असते. १ किलोमीटर लांबीचा हा प्रदक्षिणामार्ग समुद्र, वाळूचा किनारा आणि नारळ पोफळीच्या झाडांमुळे अतिशय विलोभनीय आहे. या ठिकाणी समुद्र आणि वाळूचा किनारा असल्याने तेथे पर्यटकांची अतिशय गर्दी पहावयास मिळते. गणपतीपुळे येथे महाराष्ट्र राज्य पर्यटन

विकास महामंडळ (M.T.D.C.)चे विश्रामगृह आहे. पर्यटनामुळे गणपतीपुळे हे पर्यटनाचे ठिकाण झाले आहे. दरवर्षी असंख्य पर्यटक भेट देतात.

**५ शनि शिंगणापूर, अहमदनगर**

अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डीजवळ वसलेल्या एक प्रमुख आणि जागृत क्षेत्र म्हणून शनि शिंगणापूर हे संपूर्ण महाराष्ट्ला परिचित आहे. शनी मंदिरामुळे गावाच्या नावात शनी जोडले गेले. अहमदनगरपासून 30 किलोमीटर अंतरावर नेवासे तालुक्यात सोनई गावापासून जवळच शनिचे शिंगणापूर हे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. येथे शनिदेव स्वयंभू पाषाण रूपात विराजमान आहेत. विशेष म्हणजे हा देव उघड्यावरच एका चौथऱ्यावर आहे. देव आहे पण देऊळ नाही असे या देवाचे वैशिष्ट्य होय. वर्षप्रतिपदा आणि वर्षातील प्रत्येक महिन्याचे चारही शनिवार येथे यात्रा भरते. शनि अमावास्या व गुढीपाडवा या दिवशी येथे मोठी यात्रा असते. शनि जयंतीस (वैशाळी अमावस्या) येथे उत्सव साजरा होतो. येथे कुठल्याही घराला आणि बँकांनासुद्धा कुलपे नाहीत. शनिदेव चोरांपासून गावाचे रक्षण करतो अशी स्थानिक लोकांची भावना आहे.

**६.ज्योतिबा मंदिर, वाडी रत्नागिरी (कोल्हापूर)**

महाराष्ट्रातील बहुसंख्य लोकांचे लोकदैवत व 'वाडी रत्नागिरी' या नावाने परिचित असलेले 'श्री जोतिबा देवस्थान' हे कोल्हापूर शहराच्या वायव्येस साडेसतरा किलो मीटरवर जोतिबा डोंगरावर वसले आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे ३१०० फूट उंचीवर निसर्गरम्य अशा परिसरात हेमाडपंथी शैलीतील हे मंदिर म्हणजे तीन मंदिरांचा समूह असून यातील मुख्य मंदिर हे प्राचीन आहे व उर्वरीत दोन मंदिरे हि अठराव्या शतकात बांधण्यात आल्याचा उल्लेख सरकार दरबारी आढळतो. ज्योतिबाच्या जन्मदिवशी रविवारी व श्रावणशुद्ध षष्ठीला येथे भाविकांची मोठी गर्दी होते. रत्नासुरावर मिळविलेल्या विजयाप्रीत्यर्थ चैत्री पौर्णिमेस येथे भव्य जत्रा भरते. कर्नाटक, मध्य प्रदेश, महाराष्ट्र व देशाच्या इतर भागांतूनही लाखो भाविक येथे गोळा होतात. ज्योतिबाचा डोंगर माणसांनी अक्षरश: फुलून जातो.

**७. विठ्ठल मंदिर,पंढरपुर (सोलापूर)**

महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यातील विठ्ठल मंदिर, पंढरपूर हे एक हिंदू धर्मयाचे धार्मिक पर्यटन स्थळ आहे. चंद्रभागा नदीच्या काठावर वसलेले हे धार्मिक पर्यटन स्थळ सर्व वारकरी संप्रदायाचे

आकर्षण आहे. पंढरपूर हे श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी यांचे पवित्र स्थान आहे. पंढरपूर भारताची दक्षिण काशी व महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणुन पण प्रसिध्द आहे. श्री विठ्ठलाच्या प्राचीन मंदिराचे ११९५ मध्ये जीर्णोद्धार करण्यात आले. शहरात इतर हिंदू देवतांचे मंदिरे व अनेक संतांचे मठ (धर्मशाळा) आहेत. आषाढी व कार्तिकी एकादशी व्यतिरिक्त पंढरपुरात १२ महिने नेहमीच महाराष्ट्रातील व लगतच्या राज्यातून असंख्य संख्येने भाविक विठूरायाच्या दर्शनासाठी गर्दी करतात. आषाढी व कार्तिकी वारीसाठी राज्यातील विविध ठिकाणाहून संतांच्या पालख्या निघून वाखरी येथे जमतात.विठ्ठल मंदिरात काकड आरती, महापूजा, महानैविध्य, पोशाख, धुपारती, पाद्यपूजा, शेजारती इत्यादी विविध नित्योपचार केले जातात.

**८. श्रीक्षेत्र नृसिंहवाडी (कोल्हापूर)**

कोल्हापूर जिल्ह्यातील, शिरोळ तालुक्यातील श्रीक्षेत्र नृसिंहवाडी अर्थात श्रीदत्तमहाराजांची लाडकी राजधानी श्रीनरसोबाची वाडी येथे आधीच १२ महिने २४ तास पुण्यकालच असतो. तेथे गुरु कन्या राशीत गेल्यावर वर्षभर महापुण्यकाल सुरू असतो. त्यालाच कन्यागत महापर्वकाल म्हणतात. श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथे दर १२ वर्षांतून एकदा कन्यागत सोहळा मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. असे म्हटले जाते की १२ वर्षांतून एकदा येथे गंगा अवतीर्ण (प्रकट) होते, आणि तेव्हा देव्हाऱ्यातील उत्सवमूर्तीला त्या गंगेत स्नान घातले जाते. याला शाही स्नान असेही म्हणतात. सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातून वाहणारी पंचगंगा नदी कुरुन्द वाड जवळ कृष्णा नदीस मिळते तेथून जवळच श्रीक्षेत्र नृसिंहवाडी (नरसोबाची वाडी) येथे दत्ताचे जागृत देवस्थान आहे.

**९. तुळजाभवानी मंदिर, तुळजापूर (उस्मानाबाद)**

तुळजापूर हे महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्ह्यातले शहर आहे. येथे तुळजाभवानीचे प्रसिद्ध मंदिर असून ते महाराष्ट्रातील देवीच्या साडेतीन पीठांपैकी एक असल्याची हिंदू भाविकांची श्रद्धा आहे. महाराष्ट्रातील हिंदू भाविकांमध्ये या देवीस विशेष महत्त्व असून नवरात्रात येथे मोठा उत्सव व भक्तांची गर्दी असते.नवरात्र महोत्सवात देशभरातून भवानीमातेचे भक्त मनोभावाने देवीची ज्योत पेटवून नेतात. संपूर्ण भारतात महाराष्ट्राची कुलस्वामिनी म्हणून तुळजाभवानी देवीस मान आहे. स्वराज्य संस्थापना करणारे शिवाजीराजे भोसले यांच्या भोसले घराण्याची ही कुलदेवता होय. या देवीच्या आशीर्वादाने शिवाजीराजांना राज्यस्थापनेची प्रेरणा मिळाली.

**१०. श्री स्वामी समर्थ मंदिर ,अक्कलकोट (सोलापूर)**

श्री स्वामी समर्थ महाराजांचे स्थान म्हणुन अक्कलकोट प्रसिध्द आहे. अक्कलकोट शहर सोलापूर जिल्हा मुख्यालयापासून ३८ कि मी अंतरावर वसलेले आहे. श्री स्वामी समर्थ महाराजांना श्री दत्तात्रयाचे अवतार मानले जाते. श्री स्वामी समर्थांची समाधी भक्ताकडून पुजली जाते. दर वर्षी चैत्र शुद्ध त्रयोदशीला स्वामी समर्थांची पुण्यतिथी साजरी केली जाते. राज्यातून व पर राज्यातून मोठ्या संख्येने भक्त गण नित्य नेमाने भेट देतात.

**११. श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर ,मुंबई**

श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर हे भगवान श्री गणेशला समर्पित हिंदू मंदिर आहे. हे प्रभादेवी, मुंबई, महाराष्ट्र येथे स्थित आहे. मुंबईतील हे सर्वात श्रीमंत मंदिरेंपैकी एक आहे. सिद्धिविनायक या मंदिरास एक छोटासा मंडप आहे. पवित्र देवळातील लाकडी दारे यांच्या प्रतिमा कोरलेली आहेत. सिद्धीविनायकांना “नवसाचा गणपती” किंवा “नवसाला पवणारा गणपती” म्हणून संबोधले जाते.

**१२. संत ज्ञानेश्वर समाधी, आळंदी**

महाराष्ट्रातील प्रसिद्ध संत संत ज्ञानेश्वर यांचे आळंदी हे समाधिस्थान आहे. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या जीवनातील काही काळ येथे व्यतीत केला. आळंदी हे गाव पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यात आहे. आळंदी पुण्यापासून पंचवीस किलोमीटरवर आहे. वारकरी लोकांसाठी तसेच समस्त मराठी जनांसाठी आळंदीला मोठे महत्त्व आहे.आळंदी हे शहर इंद्रायणी नदीच्या तीरावर वसलेले आहे. संत ज्ञानेश्वर समाधी मंदिराच्या मागच्या बाजूला नदीवर असलेला घाट अतिशय सुंदर आहे. ज्ञानेश्वरांनी वयाच्या एकविसाव्या वर्षी येथे १२१८ साली जिवंत समाधी घेतली. त्या जागी एक सुंदर समाधिमंदिर १५७० मध्ये बांधण्यात आले असे सांगितले जाते.आषाढ महिन्यातील एकादशीला आळंदीहून निघून पंढरपूरला ज्ञानेश्वरांची पालखी जाते. या पालखीसोबत लाखो वारकरी अंदाजे २१६ किमी अंतर पायी चालत पंढरपूरला विठोबाच्या दर्शनासाठी जातात.

**13. संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज जन्मस्थान, पुणे**

देहू हे पुणे जिल्ह्यातील गाव आहे. संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराजांचे हे जन्मस्थान इंद्रायणी नदीच्या काठी असून याच गावात श्री तुकाराम सदेह वैकुंठाला गेले अशी आख्यायिका आहे. ज्या डोंगरात एकांतात बसून तुकारामांनी अभंग रचना केली व अवघ्या महाराष्ट्रात भक्तीचे मळे पिकवले तो भंडाऱ्याचा डोंगर देहूपासून अवघ्या ६ कि. मी. अंतरावर आहे. हा डोंगर भाविकांचे श्रद्धास्थान बनून राहिला आहे. आज या

डोंगरावर जाण्यासाठी थेट पक्का रस्ता आहे. ज्या इंद्रायणी डोहात तुकारामाचे अभंग त्यांच्या निंदकांनी बुडवले तो डोहही इंद्रायणीकाठीच नजिक आहे. तुकाराम महाराजांच्या आत्मिक सामर्थ्यामुळे हे अभंग पुन्हा वर येऊन तरले होते. तुकाराम बीज, म्हणजे संत तुकाराम महाराजांच्या सदेह वैकुंठ गमनाचा दिवस, म्हणजेच आम्हा साधकांच्या दृष्टीने या संतश्रेष्ठाच्या चरणी कोटी कोटी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असतो.

**१४. खंडोबा जेजुरी**

पुणे जिल्ह्यातील खंडोबाचे हे देवस्थान आहे. हे महाराष्ट्राचे कुलदैवत असून जेजुरीचा खंडोबा या नावाने हे सर्वपरिचित आहे. उंच डोंगरावर असलेल्या कडेपठार या ठिकाणी जुने खंडोबाचे स्थान होते. परंतु आता जेजुरी या ठिकाणी नव्याने बांधलेले देऊळ आहे. तरी तेही आता तीन शतकांपूर्वीचे देऊळ आहे. देवळासमोर दगडी दीपमाळा आहेत. सुमारे ३५० पाय-या चढून वर गेल्यावरच मल्हारी मार्तंडाचे म्हणजेच खंडोबाचे दर्शन होते. नवलाख पायरीचा (नऊ लाख पाय-या) डोंगर असेही या देवस्थानच्या डोंगरास म्हटले जाते. देऊळ अतिशय सुंदर आहे. सभामंडप आणि गाभारा असलेल्या या देवळात खंडोबाची मूर्ती आहे. म्हाळसा, मणिमाला आणि खंडोबा अशा तीन सुबक मूर्ती देवळात आहेत. देवळात तलवार, डमरू आणि परळ या पुरातन वस्तू जतन केलेल्या आहेत. अतिशय जड अशी पुरातन तलवार उचलण्याचा एक अवघड खेळ इथे दरवर्षी खेळला जातो. उंच धरून तलवार जास्तीत जास्त वेळ उचललेली ठेवणा-या व्यक्तीला बक्षिस देण्याची पद्धत आहे. दस-याच्या दिवशी मोठी यात्रा इथे भरते.तसेच सोमवती अमावास्येलाही भाविक येथे दर्शनासाठी गर्दी करतात.

**१५. श्री क्षेत्र शेगाव**

शेगांव हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील बुलढाणा जिल्ह्याचा एक तालुका आहे.बुलढाणा जिल्ह्यातील शेगांव हे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. प. प. श्री गजानन महाराजांचे वास्तव्याने परम पावन झालेले श्री क्षेत्र शेगाव! महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थस्थानांमध्ये गणले जाणारे शेगाव स्थित गजानन महाराजांच्या मंदिरात दर्शनासाठी नेहमीच भाविक गर्दी करतात. गजानन महाराजांच्या प्रकटदिनानिमित्त मुख्य यात्रा महोत्सवात जवळ पास एक हजारापेक्षा जास्त भजनी दिंड्या सहभागी होणार आहेत. यात एकूण एक ते दोन लाख वारकरी भाविक सहभागी होतील. महाराजांच्या समाधीस्थळावर एक भव्य मंदीर बांधले गेले असून त्याची व्यवस्था तेथील 'गजानन महाराज संस्थान' पाहते. तेथील संस्थानाच्या 'भक्त निवास' मध्ये अल्प दरात मुक्कामाची सोय केलेली आहे. तेथे ७०० खोल्यांची व्यवस्था असून, गर्दीच्या वेळेस त्याव्यतिरिक्त ५००० बिछाने देखील पुरविण्यात

येतात.येथे येणाऱ्या भक्तांच्या आवडीनुसार वेगवेगळया प्रकारच्या निवासाची व्यवस्था येथे आहे. याच संस्थानाने आनंद-सागर हे प्रेक्षणीय स्थळ सुमारे ३५० एकर जागेपैकी सध्या १२० एकर जागेवर निर्माण केले असून पर्यटकांमध्ये ते अत्यंत लोकप्रिय आहे.त्याच्या विस्ताराचे काम खूप चांगल्या प्रकारे सुरु आहे.ते शेगांव-बाळापूर रस्त्यावर, शेगांवपासून सुमारे २.५ कि.मी. अंतरावर आहे. तेथे जवळच 'आनंद सागर विसावा' येथेही भक्त निवास असून तेथेही राहण्याची व भोजनाची सोय आहे.

**१६. सचखंड साहिब गुरुव्दारा, नांदेड**

गोदावरीच्या नदीकिनारी वसलेले मराठवाड्यातील नांदेड हे शीख धर्मियांचे प्रमुख श्रद्धास्थान आहे. नांदेड शहरातील सचखंड गुरुव्दारा हा अतिशय महत्वाचा असून अमृतसर येथील सुवर्ण मंदीरानंतर नांदेड येथील गुरुव्दाराचे नांव घेतले जाते. शीख समाजांचे १०वे गुरु गुरुगोविंदसिंघजी यांच्याम स्मररणार्थ हा गुरुव्दा्रा बांधण्यात आला आहे.

**१७. हाजी अली दर्गा (मशीद ),मुंबई**

भारत देशाचे मुंबई या आर्थिक शहरातील दक्षिणेकडील वरळीचे समुद्रकिनाऱ्यावरील लहानशा बेटावर अतिशय प्रतिष्टीत आणि प्रसिद्ध ठिकाणी हाजी अली दर्गा (मशीद) आहे.[ हाजी आली दर्गा हा एक इंडो – इस्लामिक वास्तु कलेचा आदर्श सुंदर नमूना आहे. दंतकथेप्रमाणे दैवी निर्णय होऊन नशिबाचे साथीने ही वास्तु सय्यद पीर हाजी आली शाह बुखारी यांची समाधी आहे. हाजी अलीला दररोज देश-विदेशातून हजारो भाविक येत असतात. त्यामुळे धार्मिक स्थळाबरोबरच पर्यटन स्थळ म्हणूनही हाजी अलीला महत्त्व आलेलं आहे.

**१८.दीक्षाभूमी (नागपूर)**

दिक्षाभुमी भारतातील बौध्द धर्मीयांचे एक प्रमुख केंद्र आहे या ठिकाणी बौध्द धर्माचे पुनरूत्थान झाले होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या ठिकाणी 14 ऑक्टोबर 1956 रोजी स्वतः बौध्द धर्माची दिक्षा घेतल्या नंतर आपल्या 5 लाखांपेक्षा अधिक अनुयायांना बौध्द धर्माची दिक्षा दिली.त्यानंतर दुस.या दिवशी 15 ऑक्टोबरला 3 लाख अनयायांना बौध्द धर्माची दिक्षा दिली आणि स्वतः देखील पुन्हा दिक्षीत झाले.दरवर्षी या ठिकाणी 25 लाखांपेक्षा अधिक बौध्द अनुयायी येत असतात, महाराष्ट्र सरकार ने दिक्षाभुमी ला ’अ’ वर्ग पर्यटन क्षेत्राचा दर्जा दिला आहे.नागपुर शहरातील सर्व धार्मीक आणि पर्यटन स्थळांपैकी हे पहिले असे स्थळ आहे ज्याला ’ए’ क्लास चा दर्जा प्राप्त झाला.दिक्षाभुमी भारतात बौध्द धर्माचे तिर्थस्थळ म्हणुन मानल्या जाते

लाखो तिर्थयात्री दरवर्षी दिक्षाभुमीला येतात विशेषतः धम्म चक्र प्रवर्तन दिनाला लाखो अनुयायांचा समुदाय या ठिकाणी येत असतो.

## ४.3 महाराष्ट्रातील सांस्कृतिक पर्यटन केंद्रे (Cultural tourism centers in Maharashtra)

## ४.४ महाराष्ट्रातील ऐतिहासिक पर्यटन केंद्रे / स्थळे (Historical tourism centers in Maharashtra)

महाराष्ट्र राज्याची ओळख इथला इतिहास, संस्कृती, भाषाशैली आहे. ज्यामुळे या राज्याला आजही समृद्ध ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ठिकाणांचा वारसा लाभलेला आहे. महाराष्ट्रातील ऐतिहासिक स्थळे पाहून तुम्ही महाराष्ट्राचा इतिहास जाणून घेऊ शकता. ही महाराष्ट्रातील ऐतिहासिक स्थळे तुम्हाला हा इतिहास आजही सांगू शकतात. या ठिकाणी असलेल्या ऐतिहासिक खुणा अनेक वर्षांपूर्वीच्या आठवणींचा नकळत मागोवा घेऊ लागतात. वास्तूशास्र आणि स्थापत्यशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी ही पर्यटन स्थळे नक्कीच परफेक्ट आहेत. महाराष्ट्र राज्यात दरवर्षी देशविदेशातून लाखो पर्यटक येत असतात. या पर्यटकांना नेहमीच महाराष्ट्रातील ऐतिहासिक स्थळे भुरळ घालतात. कारण या स्थळांना भेट दिल्यामुळे त्यांना महाराष्ट्रात कधी काळी घडून गेलेला इतिहास पुन्हा नव्याने अनुभवता येऊ शकतो. महाराष्ट्रा मध्ये ऐतिहासिक पर्यटन स्थळे अनेक आहेत त्यातील काही महत्त्वाची पर्यटन स्थळे पुढीलप्रमाणे

**१.रायगड किल्ला, रायगड**

**२. शनिवार वाडा, पुणे**

**३. विजयदुर्ग किल्ला**

**४. सिंधुदुर्ग किल्ला**

**५. गेट वे ऑफ इंडीया, मुंबई**

**६. प्रतापगड,सातारा**

**७. छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय,मुंबई**

**८. देवगिरी किल्ला, दौलताबाद**

**९. लाल महल, पुणे**

**१०. आगा खान पॅलेस, पुणे**

**११. अजिंठा अलोरा लेणी,औरंगाबाद**

**१२.बिबी का मकबरा, औरंगाबाद**

**१३. न्यू पॅलेस,कोल्हापूर**

**१४.अंबरनाथ शिवमंदिर**

**१५. शिवनेरी किल्ला**

**१६. मुरुड-जंजिरा किल्ला, रायगड**

**१७. पन्हाळा, कोल्हापूर**

**१.रायगड किल्ला, रायगड**

महाराष्ट्राच्या इतिहासात रायगड किल्ल्याला एक विशेष ओळख आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्याची राजधानी म्हणजे किल्ले रायगड. रायगड जिल्ह्यातील सह्याद्रीच्या पर्वत रांगांमध्ये 2700 मिटर उंचीवर हा गड आहे. अतिशय दुर्गम आणि अजिंक्य अशा या किल्याचे नाव पूर्वी रायरी असं होतं. स्वराज्याची राजधानी म्हणून जाहीर केल्यावर महाराजांनी या किल्ल्याची आणखी बक्कम बांधणी करून घेतली आणि त्याला रायगड असं नाव दिलं. शिवराज्याभिषेक आणि स्वराज्यातील अनेक मंगल प्रसंगांचा हा किल्ला साक्षीदार आहे. स्वराज्याचा हा इतिहास अनुभवण्यासाठी वर्षभरात अनेक पर्यटक या किल्ल्याला भेट देतात. गडावर खुबलढा बुरूज, नाना दरवाजा, मदारमोर्चा, महादरवाजा, चोरदिंडी, हत्ती तलाव, गंगासागर तलाव, स्तंभ, पालखी दरवाजा, मेणा दरवाजा, राजभवन, राजसभा, नगारखाना, बाजारपेठ, शिरकाई देवीचे मंदिर, जगदिश्वर मंदिर, महाराजांची समाधी, कुशावर्त तलाव, वाघदरवाजा, टकमक टोक, हिरकणी टोक अशी अनेक ऐतिहासिक स्थळं आहेत.

**२. शनिवार वाडा, पुणे**

शनिवार वाडा म्हणजे पुण्यातील प्राचीन आणि  ऐतिहासिक वास्तू. शनिवार वाडा ही एक पेशवेकालीन वास्तू आहे. या ठिकाणी पेशव्यांचे निवासस्थान होते. पहिले बाजीराव पेशवा यांनी सन 1736 साली हा राजवाडा बांधला होता. त्या काळी या वाडा पुण्याच्या वैभवशाली संस्कृतीचे प्रतिक मानले जायचा. मात्र इंग्रजांनी या वाड्यावर कब्जा केला आणि हा वाडा जाळून टाकला. आता या वास्तूंमधील सर्व अवशेष नष्ट

झाले आहेत. वाड्याचा पाया आणि तटबंदीचा भाग आजूनही कायम आहे. हा वाडा पाहताना हे महाराष्ट्रातील ऐतिहासिक स्थळे पाहण्याचा आनंद तुम्हाला नक्कीच मिळू शकतो.

**३. विजयदुर्ग किल्ला**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग हा एक महत्त्वाचा जलदुर्ग आहे. हा जलदुर्ग शिलाहार राजा भोजने बांधल्याचे तपशील आहेत. हा किल्ला अंजिक्य असल्याने याला पूर्वेकडील जिब्राल्टर असंही म्हटलं जात असे.एकुण सतरा एकर भागात हा किल्ला बांधण्यात आलेला आहे. या किल्ल्याला तीन तटबंदी असून त्या तिन्ही बाजूने पाण्याने घेरलेल्या आहेत. या किल्ल्यात दोन भुयारी मार्गदेखील आहेत. या किल्ल्यावरील इतिहास जाणून घेण्यासाठी पर्यटक या ठिकाणी सतत भेट देत असतात. या किल्ल्याला महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

**४. सिंधुदुर्ग किल्ला**

सिंधुदुर्ग हा किल्ला शिवाजी महाराजांच्या आरमारी दलातील एक अभेद्य आणि अजिंक्य किल्ला होता. मालवणमधील कुरुटे बेटावर बेटावर बांधण्यात आलेल्या या किल्ल्यावर गोड्या पाण्याच्या विहीरी आहेत. चारी बाजूने समुद्र असूनही या बेटावरील या गोड्या पाण्याच्या विहीरी हा निसर्गाचा एक अद्भूत चमत्कारच आहे.  किल्ला 48 एकरावर बांधण्यात आलेल्या असून त्यात आजही अनेक गोष्टी पर्यटकांना आकर्षित करतात. किल्ल्यावर शिवाजी महाराजांचे मंदिर, मारूतीचे मंदिर, जरीमरीचे मंदिर आहे, या किल्ल्यावर जाण्यासाठी किनाऱ्यावरून प्रवासी बोटींची सोय केली जाते. हे ऐतिहासिक स्थळ पाहण्यासाठी दररोज अनेक पर्यटकांची गर्दी होते.

**५. गेट वे ऑफ इंडीया, मुंबई**

गेट वे ऑफ इंडिया हे ब्रिटीशांच्या काळात बांधलेलं भारताचं प्रवेशद्वार आहे. बेसॉल्ट दगडाचे बांधकाम केलेली ही गेट वे ऑफ इंडियाची भिंत  जवळजवळ 85 फूट उंच आहे. मुंबई दर्शन करण्यासाठी या ठिकाणी जरूर जा. मुंबईचा अथांग समुद्रकिनारा आणि गेट वे ऑफ इंडियाची ऐतिहासिक भिंत पाहण्यासाठी देशभरातून पर्यटक येतात.

**६. प्रतापगड,सातारा**

प्रतापगड हा महाराष्ट्राचा ऐतिहासिक वारसा जपणारा महत्त्वाचा किल्ला आहे. कारण या गडावर आजही अनेक ऐतिहासिक वस्तूंचे जतन करून ठेवण्यात आलेले आहे. छत्रपती शिवाजी

महाराजाच्यांच्या नित्य पुजेतील स्फटिकाचे शिवलिंग, सरसेनापती हंबीरराव मोहित्यांची तलवार अशा अनेक गोष्टी  तुम्ही या ठिकाणी पाहू शकता. हा किल्ला कोयनेच्या घनदाट खोऱ्यात वसलेला असल्याने स्वराज्यात या किल्ल्याला एक विशेष महत्त्व होते.

**७. छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय,मुंबई**

मुंबई शहरातील हे एक सर्वात महत्त्वाचं आणि प्राचीन वस्तू संग्रहालय आहे. हे म्युझियम छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानकावर आहे. हे संग्रहालय 20 व्या शतकातील असून आजही या संग्रहालयाची वास्तू भक्कम आहे. या वास्तूच्या आतील आणि आजूबाजूच्या परिसराचा आराखडा ब्रिटीश वास्तू विशारद जॉर्ज विटेट यांनी तयार केला होता. या वास्तूच्या रचनेत इस्लामी, राजपूत आणि हिंदू मंदिरांच्या वास्तू तंत्राचा वापर केलेला आहे.  या संग्रहालयात अभ्सास करण्यासाठी आणि पाहण्यासाठी अनेक प्राचीन गोष्टीं आणि दुर्मिळ चित्रं, हस्तलिखीते जतन करून ठेवलेल्या आहेत. या संग्रहालयातील विविध दालने फिरण्यासाठी कमीत कमी दोन ते तीन तास लागतात.

**८. देवगिरी किल्ला, दौलताबाद**

महाराष्ट्रातील आणखी एक महत्त्वाचा आणि ऐतिहासिक वारसा जपणारा किल्ला म्हणजे देवगिरी किल्ला. औरंगाबादजवळ दौलताबादमध्ये असलेल् या किल्ल्याला सुरगिरी किल्ला असंही म्हटलं जात असे. या किल्लाचे काही अवशेष आणि तटबंदी आजही चांगल्या अवस्थेत आहे. बाराव्या शतकात यादववंशीय राजपूत्र भिल्लम याने हा किल्ला बांधला होता. देवगिरीच्या भौगोलिक परिस्थितीमुळे या किल्ल्याला मुगल दरबारी विशेष महत्त्व होतं. आजही या ठिकाणी ऐतिहासिक खुणा पाहता येतात. हा किल्ला पाहण्यासाठी या ऐतिहासिक स्थळाला अवश्य भेट द्या.

या ठिकाणी तुम्ही खाजगी वाहनाने जाऊ शकता.

**९. लाल महल, पुणे**

पुणे शहराच्या मध्यभागी असलेला लाल महल पुण्यातील एक ऐतिहासिक वास्तू आहे. लाल महलमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे वास्तव्य होते. पुण्यात आल्यावर शिवाजी महाराजांचे बालपण याच वास्तूत गेले. याच वास्तूत त्यांनी स्वराज्याचे धडे गिरवले. त्यानंतर स्वराज्यावर कब्जा करणाऱ्या शाहिस्तेखानाची बोटेदेखील शिवाजी महाराजांनी याच महलात कापली होती. आता पुणे महानगरपालिकेने लाल महलची पुर्नबांधणी केली आहे. त्यामुळे आताची वास्तू एक पर्यटन स्थळ म्हणून नक्कीच पाहण्यासारखी आहे.

**१०. आगा खान पॅलेस, पुणे**

गांधी मेमोरिअल सोसायटीचा हा आगा खान पॅलेस इटालियन बनावटीचा आहे. ब्रिटीश राजवटीमध्ये या पॅलेसचा उपयोग भारत छोडो आंदोलनात महात्मा गांधी, कस्तूरबा गांधी,महादेव भाई यांच्यासाठी तुरूंगासाठी करण्यात आला होता. असं म्हणतात की महादेव भाई आणि कस्तूरबा गांधी यांनी याच पॅलेसमध्ये अखेरचा श्वास घेतला होता. या पॅलेसमध्ये त्यांचे स्मारकदेखील आहे.

**११. अजिंठा अलोरा लेणी,औरंगाबाद**

औरंगाबाद शहरातील अंजिठा, वेरूळा ही प्राचीन बौद्ध लेणी फारच प्रसिद्ध आहेत. ऐतिहासिक खुणा जपणाऱ्या या लेण्यांना पाहण्यासाठी आणि त्यांचा अभ्यास करण्यासाठी देशभरातून पर्यटक या ठिकाणी येतात. या लेणी घनदाट जंगलात असून त्यांना भारतातील पहिल्या जागतिक वारसा स्थळाचा मान मिळालेला आहे. अजिंठा लेण्यांमध्ये गौतम बुद्धांच्या विविध भावमुद्रा आणि शिल्प कोरण्यात आलेली आहेत.

**१२.बिबी का मकबरा, औरंगाबाद**

औरंगाबादचा इतिहास सांगणारे हे आणखी एक ऐतिहासिक स्थळ आहे. मोगल साम्राज्यात औरंगजेबचा मुलगा आजम शहा याने त्याच्या आईच्या स्मरणार्थ या वास्तूची निर्मिती केली होती. या ठिकाणी एका भव्य महालात औरंगजेबची पत्नी राबिया दुर्रानीची कबर आहे.या मकबऱ्यासाठी संगमरवरी ,लाल आणि काळ्या मिनारीचे दगड यांचा वापर केलेला आहे.  बीबी का मकबरा या स्थळाला दख्खनचा ताजमहाल असंही म्हटलं जातं.

**१३. न्यू पॅलेस,कोल्हापूर**

कोल्हापूरात कसबा बावडा मार्गावर हे ऐतिहासिक स्थळ आहे. काळ्या आणि सपाट दगडावर ही इमारत बांधण्यात आलेली आहे. या इमारतीला लागून एक सुंदर बाग आहे. अष्टकोनी आकाराची ही इमारत पर्यटकांचे मन नक्कीच वेधून घेते. श्रीमंत शाहु महाराजांचे ते निवासस्थान असून या वास्तूत अनेक ऐतिहासिक गोष्टींचे जतन करून ठेवण्यात आलेले आहे.आजही या ठिकाणी राजघराण्याचे वास्तव्य आहे. सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा लाभलेल्या कोल्हापूरात या वास्तूप्रमाणेच अनेक ऐतिहासिक स्थळे आहेत. मात्र कोल्हापूरच्या ऐश्वर्याचं दर्शन घडवतो तो हा समृद्ध न्यू पॅलेस . या वास्तूच्या आजूबाजूला तलाव, राखीव जंगल आणि वन्यप्राणी आहेत.

**१४.अंबरनाथ शिवमंदिर**

अंबरनाथ शहर हे मुंबईतील एक उपनगर आहे. या शहराला अंबरनाथ हे नाव पडलं ते याच शिवमंदिरामुळे. या ठिकाणी जागृत शिवशंकराचे स्थान आहे. अंबरनाथचं मंदिर हेमाडपंथी शैलीचे असून आत स्वयंभू शिवलिंग आहे. या मंदिराशेजारी या ऐतिहासिक स्थळाची माहिती सांगणारे अनेक शिलालेख आणि शिल्पे आढळतात. काळाच्या ओघात आता या मंदिराची पडझड झाली असली तरी त्याची बांधणी आजही प्राचीन काळातील इतिहासाचे पुरावे सांगत आहे. महाशिवरात्रीच्या दिवशी या ठिकाणी मोठी जत्रा भरते.

**१५. शिवनेरी किल्ला**

पुण्यातील जुन्नर गावात शिवनेरी किल्ला आहे. शिवनेरी किल्ल्यावर शिवाजी महाराजांचा जन्म झाला होता. शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असल्याने या किल्ल्याला एक अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. गडावर आजही शिवाजी महाराजांच्या जन्माच्या काही खुणा तुम्हाला दिसू शकतात. ज्यांना महाराष्ट्राचा इतिहास आणि शिवाजी महाराजांविषयी अधिक जाणून घ्यायचे असेल त्यांनी महाराष्ट्रातील या ऐतिहासिक स्थळाला अवश्य भेट द्यावी.

**१६. मुरुड-जंजिरा किल्ला, रायगड**

जिल्ह्यातील मुरुड-जंजिरा हा एक अभेद्य किल्ला आहे. आणि चारी बाजूंनी अरबी समुद्रने घेरलेला आहे. रायगड जिल्ह्याच्या पश्चिमेला अरबी समुद्र आहे. या समुद्राला लागूनच मुरुड तालुक्यातील मुरुड नावाचे गाव आहे. मुरुडच्यापुढे दंडा आणि राजपुरी ही गावे समुद्रकिनारी आहेत. मुरुडपासून राजपुरी चार पाच किलोमीटर अंतरावर आहे. हे गाव खाडीच्या किनाऱ्यावर आहे. या राजपुरी गावाच्या पश्चिमेला समुद्रात एका बेटावर मुरुड-जंजिरा आहे. राजपुरीहून या किल्ल्यावर जाण्यासाठी शिडाच्या होड्यांची सोय आहे.

जंजिराचा अर्थ समुद्राने वेढलेला किल्ला. भक्कम बांधकाम आणि आजूबाजूला समुद्र, याशिवाय मुरुड-जंजिराच्या तटावर ५७२ तोफा आहेत. त्यामुळेच हा जंजिरा अभेद्य होता. या तोफांमध्ये विशेष मोठी आणि लांब पल्ल्याची कलाल बांगडी ही तोफ होती. शिवाजी महाराजांच्या काळात महाराष्ट्राच्या स्वराज्यासाठी हा जंजिरा शेवटपर्यंत अजेय राहिला.

**१७. पन्हाळा, कोल्हापूर**

पन्हाळा हे महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्याचे मुख्य गाव आहे. सध्या पन्हाळा हे एक पर्यटनस्थळ म्हणून ओळखले जाते. याच पन्हाळ गडाला सिद्दी जोहारने वेढा दिला, तेव्हा छत्रपती

शिवाजीराजे यांनी मोठ्या शिताफिने स्वता:ची सुटका करुन घेऊन विशालगडाकडे कूच केली.बाजी प्रभू देशपांडे व शिवा काशिद यांनी या सुटकेत महाराजांना मदत केली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मृत्यू नंतर युवराज संभाजी महाराज यांनी स्वराज्याची सूत्रे येथूनच हाती घेतली.पन्हाळयाच्या बाजूने कोकणात कोकणात जायला अनेक मार्ग उपलब्ध आहेत. सध्याच्या स्थितीला हा एकमेव असा किल्ला आहे कि ज्याचे अवशेष अजून सुस्थितीत पाहायला मिळतात. भारत सरकारने या किल्ल्याला दिनांक २ जानेवारी, इ.स. १९५४ रोजी महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे. आज पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या दृष्टीने महत्त्वाचा किल्ला आहे

## संदर्भ ग्रंथ सूची

१. डॉ.शिंदे एस. बी.(२००६): पर्यटन भूगोल, फडके प्रकाशन, कोल्हापूर

२. डॉ. शिंदे सुनिता शंकरराव (२०१३): पर्यटन भूगोल, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद

३. डॉ. घारपुरे विठ्ठल (२००१): पर्यटन भूगोल, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर

४. खतीब के. ए (२००६): पर्यटन भूगोल, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

५. दूरशिक्षण केंद्र (२००९): पर्यटन भूगोल, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

६. प्रा. अ.वि. भागवत (१९९८): पर्यटन भूगोल, अश्वमेध प्रकाशन, पुणे

७. https://hi.wikipedia.org/wiki/